**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २०/२०२४**

**निशाणी क्र.२३ लगत.**

**<u>उलटतपास जाबदेणारतर्फे वकिल श्री एस बी खान यांचेमार्फत सुरुः–</u>**

०१. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झालेले आहे. मला मराठी व इंग्रजी लिहीता व वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मला आजघडीला कोणताही मोठा मानसिक व शारीरीक आजार नाही. साक्षीदार सांगतो की माझा अपघात झाल्याने मला मणक्याचा त्रस आहे. या व्यतिरीक्त मला इतर कोणताही त्रास नाही. मला मणक्याच्या त्रासाने जड वस्तू उचलता येत नाही व जड काम करता येत नाहीत. मला हलकी सर्व कामे करता येतात.

प्रश्नः– तुम्हाला चालण्यास व फिरण्यास व व दैनंदिन कामे करण्यास कोणतीही समस्या नाही?

उत्तर:– मला जास्तवेळ चालता येत नाही.

०२. माझा सन २०१९ मध्ये अपघात झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत मी माझ्या सरतपासात अथवा दिलेल्या म्हणण्यात नमूद केलेले नाही. तसे का नमूद केले नाही हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मला तसा कोणताही त्रास नसल्याने मी त्याबाबत सरतपासत व म्हणण्यात नमूद केले नाही. मी सरकारी दवाखन्यात उपचार घेतले. तेथे डॉक्टर नव्हते मी तेथून सरकारी गोळ्या घेतल्या होत्या. त्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास मी तयार नाही. मी अकलूज येथे राहतो. माझ्यासोबत आई वडिल राहतात. माझे दोन भाऊ मुंबई येथे राहतात व ते स्वंतत्र आहेत. माझे दोन्ही भाऊ कामधंदा करुन उत्पन्न मिळवितात.

प्रश्नः– मुंबई येथे तुमच्या कुटूंबाचे स्वतःचे घर आहे?

उत्तरः– मुंबई येथे माझ्या लहान भावाचे घर आहे.

०३. माझ्या लहान भावाचे नाव अब्दुल आहे. मी मुंबई येथील घर लहान भावाचे आहे हे दाखविण्याकरीता सध्या कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार नाही. मुंबई येथे केवळ एका खोलीचे घर आहे. त्या घरात माझे दोन्ही भाऊ त्यांच्या कुटूंबासह राहतात. त्या व्यतिरीक्त कोणतीही स्थावर मालमत्ता नाही. अकलूज येथे आमचे स्वतःचे म्हणजे माझ्या वडीलांचे घर आहे. सदर घरामध्ये चार खोल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या अकलूज येथील घरासमोर आमचे छोटे दुकान आहे. मी माझ्या पत्नीपासून दि.०३/०५/२०१८ पासून विभक्त राहत आहे. हे म्हणणे खरे

आहे की, तेंव्हापासून माझ्या दोन्ही मुली माझ्या पत्नीकडे राहत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि ०३/०५/२०१८ पासून न्यायालयात भरलेल्या निर्वाह भत्याच्या रकमे व्यतिरीक्त मी माझ्या पत्नीला व मुलींना कोणतीही मदत केलेली नाही. मी दि.०३/०५/२०१८ रोजी ५ हजार रुपये माझ्या पत्नीला दिले होते. त्या व्यतिरीक्त मी माझ्या पत्नीला व मुलींना आजपर्यंत काहीही दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निर्वाह भत्याची रक्कम तसेच दिलेले ५ हजार रुपये व्यतिरीक्त मी माझ्या पत्नीची व मुलींचे सांभाळाकरीता व निर्वाहाकरीता इतर कोणतीही व्यवस्था केली नाही. माझी मोठी मुलगी नारायणदास शाळेत इयत्ता ८ वी मध्ये असून लहान मुलगी जिल्हा परिषद शाळा सरस्वतीनगर येथे पहिलीमध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०३/०५/२०१८ पासून आजपर्यंत मी माझ्या मुलींना एकदाही भेटलेला नाही. मी माझ्या मोठ्या मुलीला शाळा सुटल्यानंतर इंदापूर बस स्टॅन्डवर भेटलो होतो. मी आजपर्यंत मुलीला दोन वेळेस भेटलेलो आहे. त्याची तारीख मला सांगता येणार नाही. मी माझ्या छोट्या मुलीला आजपर्यंत पाहिलेले नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मुलींना भेटण्याची व्यवस्था करण्याकरीता अर्जदारास निर्देश देण्याबाबत आजपर्यंत कोणत्याही न्यायालयात कोणताही अर्ज दाखल केला नाही. मी जिल्हा न्यायालयात अपीलामध्ये माझ्या मुली मला परत मिळाव्यात असा अर्ज दिलेला आहे. मी त्याची प्रत दाखल करण्यास मी तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसा अर्ज दाखल केला नसल्याने मी त्याची प्रत दाखल करण्यास तयार नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी आजपर्यंत अर्जदारने माझ्याकडे नांदायला येण्याकरीता अर्ज दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अर्जदारने माझ्याकडे नांदायला येण्याकरीता वकिलांमार्फत कोणतीही नोटीस आजपर्यंत पाठविलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी अर्जदारला व तिच्या मुलींना नांदविण्याची इच्छा नसल्याने मी तशी नोटीस दिली नाही अथवा अर्ज दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पत्नीने सन २०१२ माझ्याविरुध्द फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४८/२०12 हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या अर्जात आमची तडजोड झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे पुरसिस दाखल करुन मी अर्जदारला नांदविण्यास नेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या पुरसिसमध्ये मी माझ्या पत्नीची व मुलींची संपुर्ण काळजी घेणार, माझ्या पत्नीला कोणाकडूनही कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेणार असे नमूद केले होते. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात लिहून

दिल्यांनतरदेखील मी, माझे आई वडिल, भाऊ व भावांची पत्नी यांनी माझ्या पत्नीला शारीरीक व मानसिक त्रास देणे सुरू केले.

०६. हे म्हणणे खरे आहे की, विवाहानंतर मी व माझी पत्नी मुंबई येथे राहत होतो. साक्षीदार सांगतो की, आम्ही भाड्याच्या खोलीत राहत होतो. मला सदर खोली मालकाचे नाव सांगता येणार नाही. आम्ही मुंबईहून अकलूज येथे सन २०१२ मध्ये आलो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही मुंबईहून अकलूज येथे आलो त्यावेळी माझ्या मोठ्या मुलीचा जन्म झालेला होता. माझ्या मोठ्या मुलीचा जन्म इंदापूर येथील खबाले यांच्या दवाखान्यात झाला. तिची जन्म तारीख ०४/१०/२०११ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मोठ्या मुलीच्या जन्माच्या दवाखान्याचा खर्च माझ्या वडिलांनी केला. साक्षीदार सांगतो की, मी खर्च केला. सदर खर्च केल्याबाबत पावत्या अथवा कागदपत्रे मी दाखल करु शकत नाही. साक्षीदार सांगतो की, त्याबाबतची कागदपत्रे अर्जदारकडे आहेत.

०७. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदारास चार बहिणी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारास देखील मुलगी झाल्याने आम्ही अर्जदाराचा तिला तिच्या आई वडिलांप्रमाणेच मुलगी झाली व मुली होतील असे म्हणून शारीरीक व मानसिक छळ केला. हे म्हणणे खरे नाही की,अर्जदारास दुसरी मुलगी झाल्यानंतर आम्ही अर्जदाराचा शारीरीक व मानसिक छळ जास्त प्रमाणात केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आम्ही माझ्या पत्नीला शारीरीक व मानसिक त्रास देवून दि.१४/०९/२०१८ रोजी घरातून मुलींसह हाकलून दिले.

०८. हे म्हणणे खरे नाही की, विभक्त झाल्यापासून मी स्वतः अथवा पाहुण्यांमार्फत अर्जदारास परत नांदायला नेण्याकरीता काहीही प्रयत्न केलेले नाही. मी अर्जदारास स्वतः नांदायला येण्याबाबत विनंती केली होती. त्याची तारीख मला सांगता येणार नाही. मी अर्जदारास साधारणतः १० वेळेस तशी विनंती केली आहे. त्याबाबतचा मजकूर माझ्या सरतपासात व म्हणण्यात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तशी कधीही विनंती केली नाही, त्यामुळे मी तसे सरतपासात व म्हणण्यात नमूद केले नाही. मी माझ्या नातेवाईकांमार्फत अर्जदाराला नांदायला आणण्याचे प्रयत्न केले नाहीत.

०९. हे म्हणणे खरे आहे की, भारतीय दंड संहिता कलम ४९८अ अन्वयेच्या खटल्यातून आमची मुक्तता झाल्यानंतर त्याविरुध्द माझ्या पत्नीने अपील दाखल केले असून त्याचे कामकाज प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत महाराष्ट्र

शासनानेदेखील वेगळे अपील दाखल केले असून त्याचेही कामकाज प्रलंबित आहे. मी आजपर्यंत न्यायालयात निर्वाह भत्याची किती रक्कम भरली हे सांगू शकत नाही. साधारणतः एक ते दिड लाख भरले आहे असेही मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की मी बारामती येथील न्यायालायात एकरकमी ४० हजार रुपये भरले आहेत. सदर रक्कम स्थगीती आदेशाच्या अर्जाच्या युक्तीवादावेळी भरलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, येरवडा कारागृहातून मुक्तता झाली त्यावेळी मी साधारणतः एक लाख रुपये एकरकमी न्यायालयात भरलेले आहेत.

१०. अर्जदारने माझ्याविरुधद व माझ्या कुटूंबीयांविरुध्द वेळोवेळी खोटे अर्ज दिले व खोटी कार्यवाही केली आणि आम्हाला त्रास दिला याबाबत मी अर्जदाराविरुध्द वेगळी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारने केलेली सर्व न्यायालयीन कार्यवाहीबरोबर असल्याने मी अर्जदाराविरुध्द तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. माझा महिन्याचा उदरनिर्वाहाचा खर्च काहीही नाही. माझा खर्च भाऊ करतो. हे म्हणणे खरे आहे की, आई वडिलांचा उदरनिर्वाहाचा खर्च माझे भाऊ करतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आई वडिलाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी माझ्यावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरासमोर माझे स्वतःचे किरणा दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी बॅटरीच्या दुकानात काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझे स्वतःचे दरमहा ४० ते ५० हजार उत्पन्न आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांच्या नावे लुमेवाडी येथे एक एकर शेती होती. ती शेती विकली असल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदारचे वडिल रिक्षा चालवितात. साक्षीदार सांगतो की, अर्जदारचे वडिल सुकट बोंबिल विकतात. अर्जदाराच्या वडिलांच्या घरामध्ये त्याच्या पाच मुली, एक मुलगा, पत्नी व वडिलांची आई असे कुटूंब आहे. अर्जदारच्या चारही बहिणींचे लग्न झालेले आहे. अर्जदाराचा भाऊ शिक्षण घेत असल्याचे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, विभक्त झाल्यापासून आजपर्यंत माझे व माझ्या पत्नीचे बोलणे झालेले नाही. माझे अर्जदारासोबत शेवटचे बोलणे साधारणतः सन २०१९–२० मध्ये मे. शेख यांच्या न्यायालयात तडजोडीवेळी झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझे आजपर्यंत अर्जदाराशी बोलणे झाले नाही. माझे अर्जदाराशी सन २०२५ मध्ये प्रत्यक्ष न्यायालयाबाहेर बोलणे झालेले आहे. त्यावेळी मी अर्जदाराला नांदायला चल असे म्हटले होते. त्याबाबत मी सरतपासात व म्हणण्यात नमूद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तसे कधीही बोललो नाही त्यामुळे मी तसे सरपासात व म्हणण्यात नमूद केले नाही.

११.		हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार आजघडीला माझ्या दोन्ही मुलीसह तिच्या वडिलांकडे राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराल घराच्या बाहेर काढल्याने ती तिच्या वडिलांकडे आश्रीताचे जिवन जगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराचा व मुलींचा स्वतःहून त्याग केला. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार व मुलींचा उदरनिर्वाह करण्याची उपेक्षा केली. हे म्हणणे खरे नाही की, मी उत्पन्न मिळविण्यास सक्षम असल्याने अर्जदारांना निर्वाहभत्ता देण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार तिच्या वडिलांच्या घरी ब्युटीपार्लर चालवित आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात अर्जदार ब्युटीपार्लर चालवित असल्याचे नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये संपुर्ण मजकूर खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

फेरतपास– नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2026.02.23 12:54:44 +0530

दिनांकः २१/०२/२०२६		(प्र.चं.बारटक्के)

ठिकाण – इंदापूर.		प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.